**—: नि.दि.मु.क्र. १२६/२०१५ मधील निशाणी ५ वरील आदेश :—**

अर्ज तसेच त्यासोबतचे जोडलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीतर्फे वकील श्री. प्रभू यांचा युक्तीवाद ऐकला. एकंदर कागदपत्रांचे अवलोकन करता प्रतिवादींचे क्षेत्र १ हेक्टर १४ गुंठे असल्याचे दिसून येते. परंतु त्याही पेक्षा जास्त क्षेत्राचा नकाशा सादर करुन मोजणी होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. भूमी अभिलेख खात्याकडील आवक जावक लिपीक यांचा अहवाल वाचला. यापूर्वी झालेल्या निरनिरळया सर्व कायदेविषयक प्रकरणांचे अवलोकन केले. जी परिस्थिती समोर आहे त्यावरुन प्रतिवादी याकामी हजर होईपर्यंत नि. ०५ च्या अर्जात मागणी केल्याप्रमाणे त्यांनी आहेत ती परिस्थिती कायम ठेवावी असा आदेश पारीत करणे गरजेचे आहे. अन्यथा वादीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी या दाव्याकामी हजर होईपर्यंत नि. ०५ च्या अर्जात विनंती कलमात मागणी केल्याप्रमाणे दावा मिळकतीची आहे ती परिस्थिती कायम ठेवावी असा आदेश करण्यात येतो.

२. दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत सदरचा आदेश कायम करण्यात का येवू नये याबाबत प्रतिवादी क्र. १ व २ यांना कारणे दाखवा नोटीस काढण्यात यावी.

३. वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ३९ नियम ३अ व ब मधील तरतूदींची पुर्तता करावी.

४. वादीला पुढे असा आदेश देण्यात येतो की जर वादीचा खटला खोटा आहे असे निष्पन्न झाले आणि त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांचे काही नुकसान झाले तर ते नुकसान वादी भरुन देईल असे हमीपत्र देवून त्याबाबत रक्कम रु. १ लाख रकमेचे हमीपत्र द्यावे.

५. दाव्याची तातडी विचारात घेता विशेष बेलिफ मंजूर करण्यात येतो. वादीने विशेष बेलिफाचे शुल्क भरावे. कार्यालयाला असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी वादीला विशेष बेलिफ पुरवावा.

६. आदेशिका परतीची पुढील तारीख १७/१०/२०१५ अशी नेमण्यात येत आहे.

सही/—
(संतोष द. चव्हाण )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मालवण.

मालवण,
दिनांक : १५/१०/२०१५.